# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २३/०४/२०२४ (मंगळवार) सायंकाळ

---

### अवैधरीत्या देशी दारुची
### वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध
### नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २२/०४/२०२४ रोजी मा. श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचे आदेशाने स्टाफ अवैध दारू विक्री व जुगार बाबतच्या रेड करणेकामी खाजगी वाहनाने पो.स्टे. खापा हद्दीतील खापा टाउनमध्ये फिरत असता मुखबीरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पारशिवनी कडुन येणाऱ्या रोडने एक इसम खापा शहराकडे निळया रंगाचे मोपेड मोटरसायकलचे डिक्कीमध्ये देशी दारूच्या निपा घेवुन जात आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून मौजा खापा येथील जवाहर टी पॉईंट येथे नाकाबंदी केली असता एक नंबर प्लेट नसलेली निळया रंगाची TVS Jupiter कंपनीची मोपेड मोटरसायकल चा चालक **आरोपी नामे– दिपक देवराव सुरूजुसे, वय ३४ वर्ष, रा. बावनगाव ता. सावनेर** हा आपल्या वाहनात अवैधरीत्या विनापरवाना नंबर प्लेट नसलेली निळया रंगाची TVS Jupiter कंपनीची मोपेड मोटरसायकलचे डिक्कीमध्ये

१) २३ निपा देशी दारू भिंगरी संत्रा नं १ प्रत्येकी १८० एम. एल. निप प्रत्येकी ७०/– रूपये प्रमाणे किंमती १६१०/– रू चा मुद्देमाल २) ५० निपा देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ एल.–१३ ऐ, प्रत्येकी ९०/ एम.एल. निप प्रत्येकी ३५/– रूपये प्रमाणे किंमती १७५०/– रू. चा मुद्देमाल ३) एक नंबर प्लेट नसलेली निळया रंगाची टि. व्हि. एस. जुपिटर कंपनीची मोपेड मोटरसायकल किंमती ९००००/– रूपये असा एकुण किंमती **९३३६०**/– रू चा मुद्देमाल मिळुन आला. तसेच नमुद घटनास्थळी आणखी एक बजाज CT 100 कंपनीची मोटरसायकल क्र. एम. एच–४०/बी.आर.–९०८१ चा चालक **आरोपी नामे– दिनेश मनोहर मानकर, वय २८ वर्ष, रा. बावनगाव ता. सावनेर** यास थांबवुन चेक केले असता त्याचे मोटरसायकलला बाजूला बांधुन असलेल्या थैलीमध्ये १) १०० निपा देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ प्रत्येकी ९० एम.एल. निप प्रत्येकी ३५/– रूपये प्रमाणे किंमती ३५००/– रू चा मुद्देमाल २) एक बजाज सी.टि. १०० कंपनीची मोटर सायकल क्र. एम. एच.–४०/बी.आर.–९०८१ किंमती ३००००/– रूपये असा एकुण किंमती **३३५००**/– रू. चा मुद्देमाल बाळगुन वाहतूक करतांना मिळुन आल्याने दोन्ही आरोपींकडुन असा एकुण **१२६८६०**/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूद्ध कलम ६५ (अ), ६५ (ई) म.दा.का. अन्वये होत असल्याने आरोपीविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली सफौ संजय उकंडे, मपोहवा संगिता कोवे, पोहवा अनिल मुंडे, पोशि नितेश पुसाम, पियुष वाढीवे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर